I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 197-200 OPEN ACCESS e-ISSN 2347 – 517X

A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# गडचिरोली जिल्हयातील रमाई आवास योजनेचा अनुसूचीत जातीच्या विकासातील योगदानाचा आढावा

**सतीश शामराव खोब्रागडे[1]व राजेश पी. कांबळे[2]**

[1,2]डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला ,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ब्रह्मपुरी

*Corresponding Author :-khobragadesatish1@gmail.com, kamblerp17@gmail.com

| Communicated : 26.01.2023 | Revision : 02.03.2023<br>Accepted : 30.03.2023 | Published : 30.05.2023 |
|---|---|---|

**सारांश :**

रमाई आवास योजनेचा विचार करता असे आढळून येते की, अनुसूचीत जातीतील कुटूंबांना हक्काचे घर मिळू लागले आहे. शासकिय अनुदानाचा योग्य वापर केल्यास आपल्या कुटूंबासाठी एक चांगले छोटेसे घर तयार होऊ शकते. शासकिय धोरण अधिकारी कर्मचारी व लाभार्थ्यांच्या अनास्थेमुळे बऱ्याच लाभार्थ्यांनी आपल्या घरकुलाचे बांधकाम पुर्ण केले नाही. याला विविध कारणे असले तरी शासनाचे अधिकारी अथवा शासकिय स्तरावरून लाभार्थ्यांची अनास्था दाखविली जाते हे काही प्रमाणत सत्य असले तरी पुर्ण सत्य वाटत नाही.

लाभार्थ्यांच्या भेटीतुन अनेक सत्य बाहेर येतात. बरेच लाभार्थी अनुदानाच्या हप्त्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी चकरा मारून—मारून थकलेले असतात. त्यामुळे नेमके म्हणणे कुणाचे खरे समजावे असा प्रश्न निर्माण होतो. तर काही अधिकारी सांगतात की, लाभार्थी घरकुलाच्या निधीची उचल करून तो निधी घरकुलाच्या बांधकामासाठी खर्च न करता आपल्या खाजगी कामासाठी खर्च करीत असतात. तर काही लाभार्थी स्वत:ची कुवत व शासकिय निकषाला डावलुन आपल्या घरकुलाचे काम अवाजवी करतात. यामुळे त्यांना अनुदान निधी पुरत नाही. परिणामत: घरकुलाची कामे ही पुर्ण होत नाही. असे अनेक उदाहरणे पहावयाला मिळतात. असे असले तरी देखील ज्या उदात्त हेतुने हि योजना तयार केली आहे. या योजनेचा चांगला प्रभाव अनुसूचीत समाजातील बांधवांच्या कुटूंबाचा समाजिक आर्थीक दर्जा उंचावतांना दिसून येतो.

**बिजशब्द**:- रमाई आवास **शरणार्थी** अनुदान लाभार्थी

**प्रस्तावना :-**

मानवाला जीवन जगण्याकरिता अन्न, वस्त्र, निवारा या मुख्य गरजांची आवश्यकता आहे. मानव अन्न व वस्त्र या दोन गरजांची पूर्तता आवश्यकतेनुसार करीत असतो. निवासाची गरज भागविण्याकरिता त्याला अनेक अडचणींना समोर जावे लागते. निवासाची गरज ही वर्तमान काळात जीवन निर्वाहासाठी अत्याधिक आवश्यक आहे. या गरजेच्या पूर्ततेने व्यक्ती आपले समाजात एक स्थान निर्माण करीत असतो. याच्यातून व्यक्तीचा विकास होण्यास मदत होते.

भारतात १९४७ च्या विभाजनानंतर शरणार्थी असलेल्या कुटुंबाकरिता आवास कार्यक्रम आखल्या जात होती. ही योजना १९६० पर्यंत कार्यान्वित होती. याच काळात सन १९५७ मध्ये सार्वजनिक विकास कार्यक्रमाचा एक भाग म्हणून 'ग्रामीण आवास योजना' या योजनेची निर्मिती करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून प्रति घराकरिता ५००० रुपये कर्जाची सुविधा शासनाने उपलब्ध करून दिली. या योजनेला लोकांनी फारसा प्रतिसाद दिला नाही. म्हणून लोकसभेने १९७२ - ७३ मध्ये एक समिती निर्माण केली. त्या समितीच्या निदर्शनास असे आले की, ग्रामीण भागात वास्तव्यात असणाऱ्या ८३टक्के लोकसंख्या पैकी ७३ टक्के लोकांना राहण्यासाठी घर नाहीत. म्हणून ग्रामीण विकास कार्यक्रमांतर्गत १९८०:- मध्ये भारत सरकारने 'इंदिरा आवास योजना' या योजनेची निर्मिती केली. सुरुवातीच्या काळात ही योजना ग्रामीण रोजगार कार्यक्रम आणि रोजगार हमी योजनेच्या द्वारे राबविण्यात आली ही योजना वेगवेगळ्या राज्यात राबवीत असताना या योजनेत एकसूत्रता आली नाही. या योजनेत एक सूत्रता आणण्याकरिता १९९५-९६ मध्ये रोजगार हमी कार्यक्रमाची सुरुवात एक उपाययोजनेच्या

स्वरूपात फक्त अनुसूचित जाती , जमाती करिता सुरू करण्यात आली. या योजनेमुळे फक्त अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांसाठी घरे उपलब्ध होत होती. परंतु इतर आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समाजातील कुटुंबांना त्याचा लाभ होत नव्हता. म्हणून एप्रिल १९८५ मध्ये जवाहर रोजगार योजनेची निर्मिती करून या योजनेचा विस्तार करण्यात आला व या योजनेतील ६ टक्के निधी इंदिरा आवास योजने करिता खर्च करण्याची तरतूद करून सर्व समाजातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबाकरिता योजना कार्यान्वित करण्यात आली.

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटावा म्हणून रमाई घरकुल योजना शासन निर्णय क्र. बीसीएच-२००८-प्र.क.३६/ मावक-२ मंत्रालय विस्तार भवन मुंबई - ३२ दिनांक १५ नोव्हेंबर, २००८ अन्वये लागू करण्यात आली. या योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी ०९ मार्च २००९ ला महाराष्ट्रातील संपूर्ण जिल्ह्यात कार्यान्वित करण्यात आली.

**पध्दती :-**

शोध निबंध लिहण्यासाठी प्रत्यक्ष लाभार्थ्यांची मुलाखत व यंत्रणेतील अधिकारी कर्मचारी यांची मुलाखत घेण्यात आली. महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेले विविध अहवाल जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा गडचिरोली यांचा अहवाल, पुस्तके, शोध साहित्य तसेच इतर संदर्भ या दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला.

**योजनेचा उद्देश :-**

या योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचित जाती व नवबौद्ध वर्गातील प्रत्येक कुटुंबाला राहण्यासाठी घर उपलब्ध करून देणे आणि समाजात त्यांचे स्थान निर्माण करून त्यांचा दर्जा उंचावण्यास मदत करणे.

**योजनेची वैशिष्ट्ये :-**

१) कच्चे घरे असणाऱ्या कुटुंबांना नवीन बांधकाम करण्यासाठी त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सोडवण्याकरिता अर्थसहाय्य दिल्या जाते.

२) लाभार्थ्यांची निवड ही प्राधान्यक्रम देऊन केल्या जात असते.

३) लाभार्थी निवडीमध्ये अनुसूचित जाती संवर्गातील अपंग लाभार्थ्यांना ३ टक्के घरकुल देणे बंधनकारक असते.

४) या योजनेअंतर्गत सुधारित अनुदान सन २०१६-१७ या आर्थिक वर्षा पासून प्रति घरकुलास शौचालय बांधकामासह अनुदान साधारण क्षेत्र करिता १३२००० व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी स्वच्छालय बांधकामासह १४२००० निश्चित केलेला आहे.

५) मनरेगा माध्यमातून लाभार्थ्यास ९० दिवसाचा रोजगार देखील उपलब्ध करून देण्यात येतो.

७) स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छालय बांधण्यात स्वतंत्र आर्थिक तरतूद केल्या जाते.

७) या योजने अंतर्गत ग्रामीण भागात २६९ चौरस फुटाचे तर शहरी भागात ३२३ चौरस फुटाचे घरकुल बांधून दिल्या जाते.

८) मंजूर घरकुलाचे काम पूर्ण झाल्यावर पंचायत समितीद्वारे पूर्णत्वाचा दाखला देण्यात येते.

९) या योजनेअंतर्गत मिळालेल्या घरकुलाची विक्री, गैरवापर, हस्तांतरण करता येत नाही.

तसेच घरकुलाची देखभाल करणे काही दुरुस्ती करणे ही त्या-त्या लाभार्थ्याची जबाबदारी असते.

**योजनेचे अनुदान वितरण व कार्यान्विती :-**

राज्य सरकार- जिल्हा परिषद (DRDA)-पंचायत समिती- ग्रामपंचायत.

ग्रामसभेने निवड केलेल्या अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची अंतिम निवड 'घरकुल निर्माण समिती' करते या समितीचे अध्यक्ष जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकारी असतात.

१) घरकुलाचे अनुदान घराचे बांधकाम सुरू असताना ५० टक्के.

२) ५० टक्के निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर ४० टक्के.

३) घराचा ताबा घेताना सक्षम अधिकारी यांनी पूर्णत्वाचा दाखला दिल्यानंतर १० टक्के.

अनुदान वरील प्रमाणे गृहनिर्माण समिती अध्यक्ष आणि सदस्य सचिव यांच्या स्वाक्षरीने विशेष जिल्हा समाज कल्याण समिती व लाभार्थ्यांच्या नावे सुरू करण्यात आलेल्या खात्यात जमा करण्यात येते.

**गडचिरोली जिल्ह्याची भौगोलिक स्थिती :-**

महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ भागात येणाऱ्या जिल्ह्यांपैकी गडचिरोली हा एक जिल्हा आहे. गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्रातील ३१ वा जिल्हा म्हणून २६ ऑगस्ट १९८२ रोजी अस्तित्वात आला. जिल्ह्याचा एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १४ हजार ४१४ असून या जिल्ह्याचा एकूण भौगोलिक क्षेत्राच्या तीन चतुर्थांशापेक्षा अधिक प्रदेश घनदाट अशा जंगलाने व्याप्त आहे. एकूण भौगोलिक क्षेत्राशी असलेले वनक्षेत्राचे प्रमाण आणि वनाखाली असणारे एकूण क्षेत्र या दोन्हीच्या दृष्टिकोनामधून या जिल्ह्याचा राज्यात प्रथम क्रमांक लागतो.

गडचिरोली जिल्ह्यात इंद्रावती, वैनगंगा, गोदावरी व प्राणहिता या प्रमुख नद्या असून गाढवी, खोब्रागडी, काठाणी शिवनी , पोर व दार्शनी या अन्य नद्या जिल्ह्यातून वाहतात. वर्धा नदी व वैनगंगा नदीच्या संगमास प्राणहिता या नावाने ओळखल्या जाते या जिल्ह्यात पोटफोडी नदीवरचे कारवापा , दीना नदीवरचे दिना धरण व खोब्रागडी नदीवरचे तुलतुली धरण ही मुख्य धरणे आहेत. गडचिरोली जिल्हा हा खनिज संपत्तीच्या दृष्टीने अतिशय संपन्न असा जिल्हा आहे. या जिल्ह्यात लोह, चुनखडी, तांबे व दगडी कोळसा ही खनिजे प्रामुख्याने सापडतात गडचिरोली तालुक्यात काठाणी नदीपरीसरात दगडी उद्योग विरहित कोळशाचे साठे आढळतात.

जिल्ह्यात एकुण १२ तालुके आहेत. जिल्ह्यात ४५७ ग्रामपंचायती असून १६८८ राजस्व गावे अस्तित्वात आहेत. जिल्ह्यामध्ये तीन विधानसभा व एक लोकसभा क्षेत्र (चंद्रपूर जिल्ह्याचा काही भाग मिळून) असून १२ पंचायत समीती आहेत. जिल्ह्यात ९ नगर पंचायती असून गडचिरोली, देसाईगंज (वडसा) व आरमोरी या शहरात नगरपालिका आहेत.

२०११ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकूण लोकसंख्या १०७२९४२ असून त्यापैकी ५४१३२८ पुरुष व ५३१६१४ स्त्रिया आहेत. त्यापैकी स्त्री-पुरुष प्रमाण ९८२ इतके आहे. लोकसंख्येची घनता ७४ चौ.की .मी. आहे. जिल्ह्यात अनुसूचित जातीची लोकसंख्या १२०७४५ असून जिल्ह्यामध्ये अनुसूचित जाती लोकसंख्येची टक्केवारी ११.२५ टक्के आहे.

**योजनेच्या लाभामुळे अनुसूचित जातीच्या विकासात परिवर्तन :-**

अनुसूचित जाती हा वर्ग अतिशय मागासलेला असल्याकारणाने या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती ही बेताची असते जिल्ह्यात वास्तव्यास असणारे कुटुंब निवासाची समस्या सोडविण्याकरिता जंगलातील लाकूडफाटा वापरून आपले निवासस्थान तयार करतात. परंतु ऊन, वारा,पाऊस या निसर्गाच्या चक्रातून कुटुंबाचे संरक्षण कच्च्या घरामध्ये योग्य प्रकारे होऊ शकत नव्हते. याचाच परिणाम असा की त्या कुटुंबात वास्तव्य करणाऱ्या व्यक्तीच्या कार्य कुशलता व कार्यक्षमतेवर होत होता.

घर हे पक्क्या स्वरूपाचे नसल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात रात्रीच्या वेळी साप,विंचू, उंदीर, घुस अशा अन्य उपद्रवी प्राण्यांची भीती राहत होती. अशा सर्व परिस्थितीचा विचार करता कुटुंबांना पक्क्या घराची नितांत गरज होती. शासनाने अशा कुटुंबांना निवारा उपलब्ध करून देण्यासाठी

शासकीय अनुदान उपलब्ध करून देऊन रमाई आवास योजनेच्या माध्यमातून सहकार्य केले आहे.

जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध बांधव रमाई आवास योजनेचा लाभ घेत आहे आहेत. योजनेचा लाभ घेताना लाभार्थ्यांना अनेक अडचणींना समोर जावे लागले. त्यावर त्यांनी स्वतः शासन स्तरावरून योग्य रीतीने निवारण करण्याचा प्रयत्न केला आणि याचमुळे शासकीय प्रणालीच्या कामकाजाचे बरे - वाईट अनुभव घेता आले. अशा एक ना अनेक अडचणींवर मात करून त्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाले. त्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जात बदल होऊन त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ झाल्याचे दिसून येते. त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ झाल्यामुळे त्यांच्या उत्पन्नात अधिक वाढ दिसून येते. समाजात त्यांना एक मानाचे स्थान प्राप्त झाले व समाजात त्यांची प्रतिष्ठा उंचावण्यास मदत झाली.

**सारांश** :-

रमाई आवास योजनेचा विचार करता असे आढळून येते की, अनुसूचीत जातीतील कुटूंबांना हक्काचे घर मिळू लागले आहे. शासकिय अनुदानाचा योग्य वापर केल्यास आपल्या कुटूंबासाठी एक चांगले छोटेसे घर तयार होऊ शकते. शासकिय धोरण अधिकारी कर्मचारी व लाभार्थ्यांच्या अनास्थेमुळे बऱ्याच लाभार्थ्यांनी आपल्या घरकुलाचे बांधकाम पुर्ण केले नाही. याला विविध कारणे असले तरी शासनाचे अधिकारी अथवा शासकिय स्तरावरून लाभार्थ्यांची अनास्था दाखविली जाते हे काही प्रमाणत सत्य असले तरी पुर्ण सत्य वाटत नाही.

लाभार्थ्यांच्या भेटीतून अनेक सत्य बाहेर येतात. बरेच लाभार्थी अनुदानाच्या हप्त्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी चकरा मारून मारून थकलेले असतात. त्यामुळे नेमके म्हणणे कुणाचे खरे समजावे असा प्रश्न निर्माण होतो. तर काही अधिकारी सांगतात की, लाभार्थी घरकुलाच्या निधीची उचल करून तो

निधी घरकुलाच्या बांधकामासाठी खर्च न करता आपल्या खाजगी कामासाठी खर्च करीत असतात. तर काही लाभार्थी स्वतःची कुवत व शासकिय निकषाला डावलुन आपल्या घरकुलाचे काम अवाजवी करतात. यामुळे त्यांना अनुदान निधी पुरत नाही. परिणामतः घरकुलाची कामे ही पुर्ण होत नाही. असे अनेक उदाहरणे पहावयाला मिळतात. असे असले तरी देखील ज्या उदात्त हेतुने हि योजना तयार केली आहे. या योजनेचा चांगला प्रभाव अनुसूचीत समाजातील बांधवांच्या कुटूंबाचा समाजिक आर्थीक दर्जा उंचावतांना दिसून येतो.

**संदर्भ**:

इंदिरा आवास योजना (आईवाय) दिशा निर्देश, भारत सरकार ग्रामिण विकास मंत्रालय, ग्रामीण विकास विभाग, कृषी भवन नई - दिल्ली ११०११४ जुन २०१३

डॉ. देसले किरण . दिपस्तंभ, स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र - २ आर्थिक व - सामाजिक विकास, दिपस्तंभ प्रकाशन हाऊसिंग सहयोग क्रिटीकल केअर हॉस्पीटल जवळ जळगांव

जिल्हा ग्रामिण यंत्रणा, गडचिरोली रमाई आवास योजना मासिक प्रगती अहवाल - २०२०

महा आवास त्रैमासिक ग्राम विकास विभाग राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामिण गृहनिर्माण एप्रिल ते जून २०२२

जिल्हा विकास पुस्तिका गडचिरोली

डॉ. नरखेकर प्रगती, डॉ. साकुरे सुनील- ग्रामीण सामुदाय, सर साहित्य केंद्र गणराज अपार्टमेंट, राजापेठ बस स्टॉप हुडकेश्वर रोड, नागपूर -३४

www.rural.nic.in

www.gadchiroli.gov in